महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्यातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/वाहतूक अधिसूचना/ ४८ /२०२४ दि. १८/०३/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी,** ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात **कासारवडवली** वाहतूक उपविभागाचे हद्दीत कासारवडवली जंक्शन येथे उड्डाणपूलाचे काम चालू असल्याने मुख्य रस्त्यावरील ठाणे घोडबंदर वाहिनीवर एकच लेन वाहतुकीसाठी उपलब्ध होते त्यामुळे रस्ता बॉटलनेक होवून वाहतूक कोंडी होत आहे. कासारवडवली पेट्रोलपंप समोरील बस स्टॉपच्या कट मधून कासारवडवली कडे जाण्यासाठी वाहनांनी टर्न घेतल्याने वाहतुकीस अडथळा होवून वाहतूक संथ होते व आनंदनगर जंक्शन पर्यंत वाहनांची रांग लागत आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होवू नये, वाहतूक सुरळीत व सुनिश्चित होण्यासाठी आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी, डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम. व्ही. ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) ठाणे घोडबंदर वाहिनीवरील कासारवडवली पेट्रोलपंप समोरील बस स्टॉप जवळील सर्व्हिसरोड कट बंद करून सर्व प्रकारच्या वाहनांना **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** अ) ठाणे घोडबंदर वाहिनीवरील सर्व्हिस रोडने आनंदनगर जंक्शन ते ओवळा जंक्शन दिशेने जाणारी वाहने ही ओवळा जंक्शन येथून इच्छीत स्थळी जातील.

**पर्यायी मार्ग –** ब) घोडबंदरच्या दिशेने जाणाऱ्या फक्त कार चालकांनी आनंदनगर सिग्नल येथून डावीकडे वळण घेवून धर्मवीर आनंद दिघे चौक येथून उजवीकडे वळण घेवून पुढे सरळ सेवन स्क्वेअर ॲकॅडमी बि. येथून उजवीकडे वळण घेवून वेदांत हॉस्पीटल येथून सर्व्हिसरोडने इच्छीत स्थळी जातील

सदर अधिसूचना दिनांक १८/०३/२०२४ रोजी पासून कासारवडवली जंक्शन येथील उड्डाणपूलाचे काम संपेपर्यंत अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर.
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर.
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर.
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे.

CamScanner

**प्रत कार्यवाहीसाठी :-**

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.

परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

**प्रत :-** पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर.

२/- सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत :-** समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे

२/- सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत :-** सपोआ वाहतूक विभाग, ठाणे, वागळे व प्रभारी अधिकारी, कापूरबावडी, कळवा, नारपोली, वागळे, वाहतूक उपविभाग

२/- म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत.

CamScanner